ISSN : 2278-8204

INTERNATIONAL MONTHLY RESEARCH JOURNAL FOR ALL SUBJECT

AKSHARDEEP

Year - IV
November - 2015

Editor
Ganesh Lahane

ISSN 2278-8204

International Monthly Research Journal For All Subject

AKSHARDEEP

Vol.IV. Issue : V
November, 2015

: Editorial Office :

Vaibhav Bhandi store's
Bhande Galli,
Subhash Chowk,
Latur Pin - 411517
(Maharashtra) India
Contact : 82759 - 41303
70380 - 72000

E-mail :

lahanegr@gmail.com

Published By :

Sankalp Prakashan Pvt. Ltd.
Latur, Dist : Latur

Price : 200/-

CHIEF EDITOR

Prof. Ganesh Lahane
Dayanand College Of Arts, Latur

CO-EDITORS

Dr. Sunita Sangole
Dayanand College Of Arts, Latur

Dr. Shatrughan Phad
A.V. College Vasai Road(W),
Dist. Thane

Prof. Keshav Algule
Jaikranti Arts Senior College, Latur

Dr. Kachave Maroti Dhondiba
Head Dept of Commerece
Late.R.W.Collage sonpeth,Dist. Parabhani

EXECUTIVE EDITOR'S

Dr. Jaydrath Jadhav,
Dept. of Marathi
Shivaji Mahavidyalay, Renapur,
Dist. Latur

Dr. Allabaksha Jamadar
Dept. of Hindi
B. K. Deshmukh College, Chakur,
Dist. Latur

Prof. Rajiv Aherkar
Dept. of English
Yvspm's Late Sow. Sheshabai
Sitaram Mundhe Arts College,
Gangakhed, Dist. Parabhani

Dr. Shivaraj Bokade
Dept. of History
Yashwant Mahavidyalaya, Nanded

Prof. Pandurang Mundhe
Dept. of Public Administration
Late. Venkatrao Deshmukh
Mahavidyalaya, Babhalgaon,
Dist. Latur

Prof. S. R. Shelke
Dept. of Commers
Mahatma Gandhi Mahavidyalaya,
Ahmedpur, Dist. Latur

DEPUTY - EDITOR

Prof. Vithal Jaybhaye
Dept. of English
Late R.W. College,
Sonpeth, Dist Parbhani

Prof. Sandipan Mundhe
Head of Dept. Lib-&-Ins-Sci.
Sambhajirao Kendre Mahavidyalaya
Jalkot, Dist. Latur

Prof. Gajanan Deokar
Dept. of Marathi
Late. Babasaheb Gorthekar
Mahavidyalaya, Umri Dist. Nanded

Dr. Balaji Digole
Head of Dept. Marathi Shivjagruti
Mahavidyalay, Nalegaon, Dist
Latur

Prof. Taterao Kendre
Physical Director
Sambhajirao Kendre
Mahavidyalaya, Jalkot, Dist. Latur

Prof. V. T. Kallurkar
Head of Dept. Hindi
Sambhajirao Kendre
Mahavidyalaya, Jalkot,Dist. Latur

टीप : या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ जबाबदार असेलच असे नाही.

अनुक्रमणिका

1.	Aspects of indian english poetry from northeast india : A small scale reflection	Goswami Pankaj	01
2.	"Rural development and poverty reducation vis - a - vis intergrated rural development programme [irdp] and mahatma gandhi national rural employment guarantee act [mnrega], 2005."	Mr. Gurnule T. M.	04
3.	A study on the open source digital library software's : A comparative study	Rathod kashinath rama	09
4.	Ethanobotanical studies on terminalia bellirica (gaertn.) roxb. Among the indigenous people of nizamabad district, telangana state	Vijigiri dinesh 1 Kolapwar balaji2	11
5.	तुलसी एवम् सूरदासजी के काव्य में बाल संस्कारों का वर्णन	डॉ. सौ. लीला श्रीकांत कर्वा	14
6.	"स्त्री विमर्श में लेखिकाओं की भूमिका"	लांडगे अमोल	16
7.	मराठी कादंबरी : एक अवलोकन	प्रा. डॉ. धस श्रीराम	18
8.	दलित कवितेचे मराठी साहित्यातील वेगळेपण	श्री. मुनगेलवार अनिल	21
9.	प्रिया तेंडूलकरच्या 'ज्याचा त्याचा प्रश्न' या कथासंग्रहातील भाषाशैली	वाळुक्कर शोभा	24
10.	पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - आदर्श राज्यकर्त्या	डॉ. वजीर प्रभाकर	27
11.	स्त्रीयांची वदलती स्थिती	प्रा. कांबळे डि. एस.	30
12.	वंगालच्या फाळणीतील लार्ड कर्झनच्या जातीयवादी भूमिकेचे चिकित्सक अध्ययन	प्रा. इंगोले संतोष	34
13.	वन - विकास व पर्यावरण संतुलन	प्रा. कुवडे जी. एस.	37
14.	वाशिम जिल्ह्यातील पारधी जमातीची शैक्षणिक स्थिती	प्रा. डॉ. धामणे संतोष	39
15.	भारतीय संविधान आणि स्त्री सक्षमीकरण	कु. ढगे कोमल	45
16.	लातूर जिल्ह्यातील नगरपरिपदांच्या पाणीपुरवठा योजनातील समस्या	प्रा. चव्हाण संजय	51
17.	७३ वी घटनादुरूस्ती आणि महिला नेतृत्त्व	प्रा. डॉ. खानापुरे(खुमसे) स्मिता	53
18.	ब्रिक्स परिषद २०१२	प्रा. रेड्डी उर्मिला	55
19.	गांधीवादाची समकालीन उपयुक्तता : एक समाजशास्त्रीय अभ्यास	प्रा. मुंडे रामकिशन प्रा. डॉ. पाटील स्वाती	57

Research Paper In Economics

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

37

ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : V,
November, 2015

वन - विकास व पर्यावरण संतुलन

प्रा. जी. एस. कुबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

प्रस्तावना : जंगले ही देशाची फार मोठी संपत्ती आहे. जंगलाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनेक फायदे असतात वनस्पती कॉर्बनडाय ऑक्साईडचे सेवन करते व प्राणवायू सोडते. त्यामूळे मनुष्य प्राण्याला श्वसनासाठी प्राणवायु सहज मिळू लागला आहे. अन्यथा मनुष्य प्राण्याला प्राणवायु मिळणे कठीण झाले असते. वनसंपत्तीचे अनेक फायदे आहेत भारतीतील जंगलातून इमारती, जळावू व व्यापारी स्वरूपाचे चार हजार प्रकारचे लाकूड मिळते लाकूड घर बांधणे, फर्निचर, शेतीचे अवजारे, रेल्वे, जहाज बांधणी, लाकडी खेळणे इत्यादी वस्तू तयार करण्यासाठी उपयोगी पडते. सोमल नावाचे लाकूड मऊ असून आगपेट्या बनविण्यासाठी त्याचा वापर करण्यात येतो. चंद्रपूर जिल्हातील जंगलात हे सोमल लाकूड सापडते बांबू, सवाई, उल्लागवत इत्यादीचा उपयोग कागद तयार करण्यासाठी होत असतो. या शिवाय लाख, राळ, टरपेन्टाईन, उपयुक्त तेल, औषधी वनस्पती, डिंक इत्यादी वस्तु जंगलापासून मिळतात.

जंगलामूळे जमीनीची सुपिकता टिकून राहते पशुपक्षी, गुरेढोरे यांना खाद्य मिळते जंगलामूळे वन्य पशुना संरक्षण मिळते व त्यांच्या संख्येत भर पडण्यास मदत होते. सीमावर्ती भागात जंगले असल्यास शत्रुपासून देशाचे रक्षण करण्यात मदत होते. भारतीय अर्थव्यवस्थेत वनसंपत्तीला फार महत्व आहे. स्थुलमानाने देशात दरवर्षी तीस कोटी घनफूट जळावू व इमारती लाकडांचे उत्पादन होते. हे जरी खरे असले तरी आता जंगलाचे संरक्षण करण्याची आणि नविन जंगले निर्माण करण्याची वेळ आलेली आहे व लाकूड संपत्तीचा फार काटकसरीने वापर केला पाहिजे.

भारतीय वनस्थिती अहवालानुसार भारतीय संघराज्यात देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २४.१६ टक्के इतके वनक्षेत्र आहे, जे की ३३ टक्के असणे आवश्यक आहे. देशात जंगलाचे प्रमाण मुळातच कमी आहे. आणि शिवाय मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल पार ढासळून गेला असून त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. दुसरी गोष्ट आपल्या देशात जंगलाची वाटणी निसर्गाने फार विषम प्रमाणात केली आहे. बहुतांश जंगले हिमाचल, विंध्यप्रदेश आणि दक्षिणेच्या पठारात दिसून येतात. इतर भागात मात्र जंगलाचे प्रमाण कमी आहे जळावू व इमारती लाकडासाठी होणारी जंगलतोड, नदी खोरे योजनांमुळे जंगल संपत्ती पाण्याखाली नष्ट झाली, औद्योगीक प्रकल्प, वसाहती, रस्ते बांधणे, रेल्वे मार्गाचा विकास व लहान जंगलांचे शेतीमध्ये परिवर्तन इत्यादी अनेक कारणामूळे जंगल व्याप्त जमीनीचे क्षेत्रफळ कमी हाऊ लागले आहे. अशा परिस्थितीत जंगलतोड थांबविणे आणि वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक झाले आहे त्यासाठी सुयोग्य सरकारी धोरणाची अत्यंत गरज आहे .

सरकारचे जंगल विषयक धोरण : स्वातंत्र्य प्राप्ती नंतर १९५० मध्ये केंद्रिय वनमंडळाची स्थापना करण्यात आली व १९५२ मध्ये केंद्र सरकारने राज्य सरकारांशी चर्चा करून राष्ट्रीय जंगल धोरण जाहिर केले. या धोरणात जंगलांच्या संरक्षणाचा आणि त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनाचा विचार करण्यात आलेला आहे. आर्थिक नियोजनात जंगल विकासाकडे लक्ष्य देण्याचे ठरविण्यात आलेले आहे १९५२ च्या धोरणानुसार एकुण भूप्रदेशापैकी ३३ टक्के भागावर जंगले असावेत असे उदिष्टे ठरले. जंगलांचे संरक्षण केल्यास त्याचे अनेक विविध फायदे मिळतील ही गोष्ट मान्य करण्यात येऊन त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले आहे. डोंगराळ भागात नद्याच्या काठावरील जमीनीची धूप थांबविण्याचे कार्य जंगले करीत असतात सागवान आणि इतर वन उत्पादनावर विशेष भर देण्याचे निश्चित करण्याचे आले आहे. १९६५ मध्ये केंद्रिय वन आयोगाची स्थापना करण्यात आली जंगल विषयक

आकडेवारी गोळा करणे, सल्ला देणे, जंगल संपत्तीसाठी बाजार पेठांचा शोध घेणे, जंगल संपत्ती विषयक कार्य करणाऱ्या विविध संस्थांमध्ये समन्वय घडवून आणणे इत्यादी कामे या आयोगाकडे सोपविण्यात आलेली आहेत.

वनक्षेत्रातील बदल : देशातील एकूण वनक्षेत्रात २०१३ ते १५ या कालावधी दरम्यान सकारात्मक बदल होऊन ५०८१ चौ.किमी वनक्षेत्राची वाढ झाली असली तरी ही वाढ सरासरी स्वरूपात आहे. क़ाही राज्यात वनक्षेत्रात वाढ झाली आहे तर काही राज्यात वनक्षेत्र कमी झाले आहे. वनक्षेत्राची सर्वात जास्त वाढ तामीळनाडू राज्यात झाली आहे त्या पाठोपाठ केरळ, जम्मु कश्मिर, कर्नाटक व उत्तर प्रदेश या वाढीचे मुख्य कारण म्हणजे पर्यावरणीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी केलेली वृक्ष लागवड आणि वृक्षसंरक्षण, संवर्धन होय. वनक्षेत्र कमी झालेल्या राज्यामध्ये मिझ ोराम, उत्तराखंड, तेलंगणा, नागालँड व अरूणाचल प्रदेश या राज्यांचा समावेश होतो. शेतीचे स्थानांतरण, विक ासासाठीच्या योजनांसाठी वृक्षतोड, अतिक्रमणे इत्यादी घटक वनक्षेत्र कमी होण्यास कारणीभूत ठरतात.

महाराष्ट्रातील वनक्षेत्र : महाराष्ट्रातील पर्यावरण कार्यकर्त्यांच्या वृक्षारोपण योजनामुळे काही भागात वाढ झाली असली तरी एकूण वनक्षेत्र मात्र कमीच झाले आहे महाराष्ट्राच्या एकूण वनक्षेत्रात उणे चार चौरस किमी एवढा बदल झाला आहे या नकारात्मक बदलाचे मूख्य कारण अतिक्रमणे, विकासासाठी वृक्षतोड, वृक्षसंवर्धनात सातत्याने येणारे अपयश इत्यादी होत. महाराष्ट्रातील एकूण वनक्षेत्र १६.४३ टक्के एवढे आहे महाराष्ट्र राज्यातील काही भागात खार फूटी वनस्पतीच्या पुनर्वसन व वृक्षारोपणामुळे वनक्षेत्रात वाढ झाली असती तरी एकूण वनक्षेत्र कमी झाले आहे देशातील एकूण १२४ डोंगराळ जिल्ह्यापैकी महाराष्ट्रात ७ जिल्हे आहेत त्यांनी राज्यातील ६९९०५ चौ. किमी भाग व्यापला आहे या सात जिल्ह्यात १५५२९ चौ.किमी वर वनक्षेत्र असून त्यापैकी ३१८ चौ.किमी अती घन वनांनी ७२३० चौ.किमी मध्यम घनवनांनी तर ७९८१ चौ.किमी क्षेत्र खुल्या वनक्षेत्रांनी व्यापलेले आहे तर १३८४ चौ.किमी वर खुरटे वनक्षेत्र आहे हे वनक्षेत्र जिल्ह्यांच्या एकूण वन क्षेत्रांच्या २२.२१ टक्के आहे व २०१३ च्या तुलनेत ११ चौ.किमी वनक्षेत्र कमी झालेले आहे.

महाराष्ट्रात एकूण १२ जिल्हे हे आदिवासी आहेत त्यांनी राज्याच्या १४४२३३ चौ. किमी भाग व्यापला असून त्यावर ३०६८८ चौ.किमी वनक्षेत्र आहे त्यापैकी ७२५६ चौ.किमी अति घन ११७६२ चौ.किमी मध्यम घन तर ११६७० चौ.किमी खुले वनक्षेत्र असून २१.५७ चौ.किमी खुरटे वनक्षेत्र आहे हे वनक्षेत्र या जिल्ह्यांच्या क्षेत्रफळाच्या २१.२८ टक्के असून २०१३ च्या तूलनेत त्यात उने १३ चौ. किमी बदल झाला आहे.

सारांश : प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत वनांना अतिशय महत्वाचे स्थान असते देशाच्या विकासामध्ये व पर्यावरण संतूलनामध्ये देशातील वनांचा अतिशय महत्वाचा वाटा असतो. भारतात आदिवासी हे जंगल, वनांचे अविभाज्य भाग राहीले आहे आदिवासी जमातीच्या धार्मीक, सामाजिक, सांस्कृतीक औषध गरजा या वनामधून पूर्ण होत असतात त्यामूळे वनाचे संरक्षण त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. भारत सरकारच्या एकात्मीक आदिवासी विकास कार्यक्रमाद्वारा एकूण २७ राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशातील १८९ जिल्हे आदिवासी जिल्हे म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत. या आदिवासी जिल्ह्यातील वनक्षेत्र ४५१२२३ चौ.किमी असून ते या जिल्ह्यांच्या भौगोलीक क्षेत्रांच्या ४०.५९ टक्के आहे २०१५ च्या मुल्यांकनानुसार आदिवासी जिल्ह्यात वनक्षेत्रामध्ये ४३८ चौ. किमी वाढ झालेली आहे. यावरून असे दिसून येते की आदिवासी जमातीच्या लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी जंगलामध्ये वाढ केलेली आहे. अशाच प्रकारे देशातील प्रत्येक व्यक्तींनी संस्कृतीचा व पर्यावरणाचा मनापासून विचार करून वृक्ष लागवड व संवर्धन केल्यास निश्चितच येणाऱ्या काळामध्ये वनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येईल व प्रत्येकांनी आपआपल्या सोईनुसार आपल्या परिसरात, अंगणात व रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन केल्यास पर्यावरणातील असंतूलन दूर करण्यात मदत होईल.

संदर्भ सूची :

१) भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणातील अर्थशास्त्र : डॉ. जी. एन. झामरे
२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२ - १३ : अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई
३) बुलेटीन ऑफ युनिक ॲकॅडमी : फेब्रूवारी २०१६